स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

'मानव्य' विद्याशाखे अंतर्गत
मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाच्या
शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

''आसाराम लोमटे यांच्या कथावाङ्‌मयाचा चिकित्सक अभ्यास''

संशोधक

पूजा अशोकराव शहाणे

रा. नांदेड, जि. नांदेड

पिन - ४३१६०५.

मार्गदर्शक

डॉ. विलास शेषराव पाटील

प्रोफेसर, संशोधक मार्गदर्शक आणि मराठी विभागप्रमुख,

ज्ञानोपासक महाविद्यालय, ता. जिंतूर, जि. परभणी.

पिन - ४३१५०९.

संशोधन केंद्र

भाषा, वाङ्‌मय व संस्कृती अभ्यास संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६.

डिसेंबर - २०२४

अनुक्रमणिका

अ.क्र. तपशिल .... पृष्ठ क्र.

१. प्रास्ताविक ३, ४

२. संशोधनाची गरज ५

३. संशोधनाची व्याप्ती ५

४. अभ्यास मर्यादा ५

५. संशोधनाची गृहितके ५

६. संशोधनाचे महत्त्व ६

७. संशोधनाची साधने ६

८. संशोधन पद्धती ६

९. संशोधनामागील उद्देश / हेतु ६

१०. संभाव्य निष्कर्ष ७

११. प्रकरण रचना ८

१२. परिशिष्टे ९

१३. संदर्भ ग्रंथसूची १०

''आसाराम लोमटे यांच्या कथा : एक चिकित्सक अभ्यास''

प्रास्ताविक :-

ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारा मराठी ग्रामीण साहित्य हा एक महत्त्वाचा साठोत्तरी प्रवाह आहे. मराठी साहित्याच्या समृद्धीमध्ये ग्रामीण साहित्याने भर टाकली आहे. तरीही ग्रामीण साहित्य म्हणजे काय? याबद्दल अनेक विचारवंतानी विविध मतांतरे व्यक्त केली आहेत. आनंद यादव यांच्या 'ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत प्रा. गो. म. कुलकर्णी म्हणतात. ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीणांनी लिहलेले? की हे सर्व? हा आणखी एक प्रश्न.

खेडे गावातील जीवनपद्धती, तेथील रीतीरिवाज, शेती, निसर्ग, मातीशी एकरूप झालेले मानवी मन, मानवी जीवनाला त्या-त्या प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक इ. ज्ञानाविषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या या साऱ्यांचा विचार अनेक ग्रामीण कथाकारांनी, लेखकांनी आपल्या कथेतून केलेला आपणास पहावयास मिळतो.

ग्रामीण कथांचा विचार करताना ग्रामीण कथाकारांनी, ज्या काही वैशिष्ट्यपुर्ण कथा, लिहिल्या आहेत, त्यांचा परामर्श घ्यावा लागतो. कथेच्या बाबतीत अग्रक्रमी नाव घ्यावे लागते ते हरिभाऊ आपटे यांचे. महाराष्ट्रामध्ये १८९७ साली मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळामध्ये मानवी जीवनाची होणारी वाताहत पाहून त्यांनी 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा लिहिली. त्याचप्रमाणे वि.स. सुखटनकरांचा 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा आठ प्रादेशिक कथांचा संग्रह १९३१ साली प्रसिद्ध झाला. त्याचप्रमाणे सुखटनकरांच्या समकालीन कथालेखक लक्ष्मण सरदेसाई यांच्या 'कल्पवृक्षाच्या छायेत', 'सागराच्या लाटा', 'वादळातील नौका', 'सोनेरी अंत', 'निवारा', 'पडसाद' हे त्यांचे कथा संग्रह वैशिष्ट्यपुर्ण आहेत. १९४२ च्या क्रांतीने खेडोपाडी नवी जागृती आली. व्यंकटेश माडगुळकरांच्या 'माणदेशी माणसं', 'गावाकडच्या गोष्टी', 'काळी आई' या कथासंग्रहातून दुष्काळातील माणसाची हालआपेष्ठा व्यक्त केली. तसेच अस्सल मातीची रग असलेला लेखक अण्णा भाऊ साठे यांचे 'फरारी', 'भानामती', 'लाडी', 'कृष्णाकाठच्या कथा' इ. कथासंग्रह प्रसिद्ध झाले. अशाप्रकारे १९४० ते १९६० च्या कालखंडात पु.भा. भावे, गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, अरविंद गोखले इत्यादी कथाकारांचा समावेश होतो. ह्या कथाकारांनी नवकथेचा नवीन प्रवाह आणला.

साठोत्तरी मराठी साहित्यात अधिकाधिक भर पडली. याच काळात आनंद यादव यांची 'उखडलेली

झाडे', 'माती खालची माती' इ. कथेतून त्यांनी ग्रामीण संस्कृती प्रकट केली. याचसह बाबा पाटील यांची 'एकूर', रणजित देसाई यांची 'वैशाख', 'काव्य', द.ता. भोसले यांचे 'अन्न', 'पाळत' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध झाले.

१९८० नंतरच्या कालखंडात वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिव, ना. धों. महानोर, लक्ष्मीकांत तांबोळी, बाबा भांड या कथालेखकांनी कथालेखन केले. १९९० नंतरही ते कथालेखन करीतच राहीले. १९९० नंतर मात्र खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकिकरणामुळे सर्वच क्षेत्रात बदल झाल्यामुळे त्याचा साहित्य प्रकारावरही परिणाम झाला. ग्रामीण कथेतून सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक बदल झाले. या बदलाचा प्रभाव २००० नंतर निर्माण झालेल्या कथेवर प्रामुख्याने झालेला आहे. राजकारण, सरकारकडून शेतकऱ्याचे होणारे शोषण, निवडणूकीचे राजकारण, सततचे दुष्काळ, शेती मालावर मिळणारा अल्प बाजारभाव, वाढते शहरीकरण, महागाई, अन्याय, नापिक, ग्रामीण संस्कृतीचा ऱ्हास अशा विविध ग्रामीण विषयांना हात घालणारे कथाकार. यामध्ये २००० मध्ये मनोहर तऱ्हार, आनंद गायकवाड, विठ्ठल जाधव, नागनाथ पाटील, विजय चव्हाण व आसाराम लोमटे या कथालेखकांचा समावेश होतो. आसाराम लोमटे हे २००० नंतरचे अत्यंत महत्त्वाचे कथाकार आहेत. आसाराम लोमटे ग्रामीण जीवनातील प्रत्येक बारकावे टिपूण ठळक निदर्शनास आणणारे कथाकार म्हणून ओळखले जातात. आज खेडे बदलून गेले आहे. माणसाच्या शैलीत, संस्कृतीत अमुलाग्र बदल, मानवी स्वभाववृत्ती, ग्रामीण समाजातील सामाजिक, आर्थिक राजकीय विषमतेमध्ये पिचला गेलेला सामान्य माणूस हा आसाराम लोमटे यांच्या कथांचा मुख्य विषय झालेला आहे.

खेड्यात जीवन जगणाऱ्या शेतकरी, शेतमजूर, ऊसतोड कामगार, गावातील दुर्लक्षित समाजाचे दुःख, शेतकरी मजूर वर्गाचे होणारे शोषण, पिळवणूक त्याचबरोबर घराच्या बाहेर न जाणाऱ्या स्त्रियावरील होणाऱ्या अन्यायाचा विरोध करण्यासाठी बाहेर पडलेली स्त्री इत्यादी विषयाचे प्रकटीकरण आसाराम लोमटे यांनी आपल्या 'इडा पीडा टळो', 'आलोक', 'वाळसरा' कथासंग्रहातून प्रकर्षाने व्यक्त केलेल्या आहेत.

आसाराम लोमटे यांच्या 'आलोक' (२०१६) कथासंग्रहास अतिशय प्रतिष्ठेचे असे साहित्य अकादमी पारितोषिक मिळाले आणि या लेखकाच्या अस्सल गुणवत्तेचे यथार्थ कौतुक राज्यभर सुरू झाले. 'इडा पिडा टळो' (२००६) या त्यांच्या कथासंग्रहाने एका जबर गुणवत्तेची निशाणी उमटवलेली आहे. ह्या त्यांच्या पहिल्या संग्रहास महाराष्ट्र फांउडेशनचा पुरस्कार प्राप्त झाला आणि 'वाळसरा' (२०२३) सारख्या पारंपारिक वळणाच्या वाटणाऱ्या कथासंग्रहातून मानवी मनाचा तळ गाठण्याचा केलेला प्रयत्न ह्या सर्व कथा साहित्याचा अभ्यास करणे अपरिहार्य आणि महत्त्वाचे ठरते.

संशोधनाची गरज :

प्रस्तावनेत विशद केल्याप्रमाणे मराठी ग्रामीण कथांच्या आणि लेखकांच्या आधारे आसाराम लोमटे यांच्या कथांचा अभ्यास शोध घेणे ही संशोधनाची गरज आहे. ग्रामीण समाज जीवनातील माणसाचे माणुसपण, संस्कार, मूल्ये, निसर्ग, प्राणी जीवन ग्रामीण जीवनाचा सर्वांगीण अभ्यास करणे, ही संशोधनाची गरज आहे.

संशोधनाची व्याप्ती :

या प्रबंधात कथाकार आसाराम लोमटे यांच्या कथासंग्रहाचा ग्रामीण समाजवास्तवाच्या दृष्टीकोनातूनच अभ्यास करणे ही संशोधनाची व्याप्ती आहे. म्हणजेच आसाराम लोमटे यांच्या 'इडा पीडा टळो २००६', 'आलोक (साहित्य अकादमी पुरस्कृत) २०१६' व 'वाळसरा (२०२३)' ह्या कथासंग्रहाच्या आधारे संशोधन करण्यात येणार आहे.

अभ्यास मर्यादा :

आसाराम लोमटे यांच्या कथांचा 'इडा पीडा टळो', 'आलोक' व 'वाळसरा' कथासंग्रहाच्या विशेषांचाच अभ्यास या संशोधनात अंतर्भूत आहे. आसाराम लोमटे यांनी लिहलेले कथासंग्रह ही ह्या संशोधनातील लिखित सामग्री असेल. तसेच त्यांच्या अभ्यासकांनी घेतलेल्या मुलाखतींचा आढावा घेण्यात येईल. या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही विषयाचा अभ्यास अपेक्षित नाही.

गृहितके :

१) आसाराम लोमटे यांचे कथासाहित्य जनसामान्यापर्यंत पोहचले असले तरीही त्यांच्या कथेतून व्यक्त झालेल्या बदलत्या ग्रामीण समाज जीवनाच्या वास्तवाचा शोध घेणे.

२) आसाराम लोमटे यांचे कथासंग्रह सर्वदूर परसरलेले असले तरी त्यांच्या कथा मागील मूळ संकल्पना स्पष्ट करणे.

३) शेतकरी, शेतमजूर, स्त्रियांचा हक्क, ऊसतोड कामगार, दुर्लक्षित समाज जीवनाचा शोध हा गांभीर्यपूर्वक लिहिल्या गेलेल्या कथेतून घेणे.

४) कथेतील स्वाभिमानी माणसाचा व निडर, खंबीर स्त्रियांच्या स्वभाव विशेषांचा अभ्यास करणे.

५) कथेतून आलेले सामाजिक प्रश्न, उच्चभ्रु वर्गाकडून जनसामान्य शेतकरी व मजूरांची केली जाणारी पिळवणूक, नैसर्गिक संकट, बेरोजगारी, शिक्षण व्यवस्था, शेतकऱ्यांचे कर्ज व त्यांच्या आत्महत्या इत्यादीचा शोध घेणे.

६) ग्रामीण जीवनातील बदलांचे संदर्भ, कारण मीमांसा जागतिकीकरणातून आलेल्या चांगल्या वाईट परिणामांचा शोध घेवून त्यातून निर्माण झालेला भकासपणा, उद्ध्वस्तता व त्यांच्या परिणामाचा शोध घेणे.

संशोधनाचे महत्त्व :

ग्रामीण समाज जीवनातील सर्वच घटकांचे आणि भाषिक विशेषाचे अस्तित्व टिकवणे गरजेचे आहे. ग्राम जीवनातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय बदलांचा खेड्यातील सामान्य माणसावर शेतकरी, शेतमजुर, कष्टकरी वर्गावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याचे आजचे व कालचे ग्रामजीवन त्यांचे मनोव्यापार, सांस्कृतिक संवेदन सखोलपणे आणि सर्वांगिण स्वरूपात व्यक्त करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्रामीण जीवनातील सुख–दु:ख, चढउतार स्थितीगती त्यांच्या जीवनाचे वास्तविक रूप जाणून घेण्याच्या दृष्टीने संशोधनाचे महत्त्व आहे.

संशोधनाची साधने :

१) प्रस्तुत संशोधनासाठी आसाराम लोमटे यांच्या मूळ कथासंग्रहाचा ('इडा पीडा टळो', 'आलोक', 'वाळसरा') ह्या कथेवर आधारभुत साधन म्हणून वापर करण्यात येईल.

२) ग्रंथालयातील संदर्भग्रंथ व इतर ग्रंथाचा वापर करण्यात येईल.

३) आसाराम लोमटे यांच्या अभ्यासकांशी चर्चा करून मिळालेल्या माहितीची वस्तुनिष्ठपणे प्रबंधात मांडणी करण्यात येईल.

४) वर्तमानपत्रातील प्रसिद्धलेख, नियतकालिके व अंक याचा वापर करण्यात येईल.

संशोधन पद्धती :

आसाराम लोमटे यांच्या कथासंग्रहाचा अभ्यास करीत असताना अभ्यासातील प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा योग्यरित्या वापर करण्यात येईल. त्याचबरोबर विश्लेषण, तुलनात्मक संशोधन पद्धती आणि ऐतिहासिक संशोधन पद्धती व इंटरनेट वरील साहित्य या पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

संशोधनामागील उद्देश :

१) आसाराम लोमटे यांच्या कथेतील वैचारिक भुमिका समजून घेणे.

२) आसाराम लोमटे यांच्या कथासंग्रहातील प्रेरणेचे स्वरूप समजून घेणे.

३) ग्रामीण जीवनातील चढउतार आणि तेथील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय स्वरूपाचे बदलते चित्र समोर आणून त्यांचा शोध घेवून लेखकाच्या वैचारिक संकल्पनेचा शोध घेणे.

४) मराठी ग्रामीण कथेची प्रेरणा शोधणे.

५) आसाराम लोमटे यांच्या कथासंग्रहातील भाषाशैली आणि ग्रामीण शब्दांचे वेगळेपण लक्षात घेणे.

संभाव्य निष्कर्ष :

प्रस्तुत संशोधनाच्या आधारे ग्रामीण कथेचे स्वरूप व त्याची वैशिष्टे साधार पहावयास मिळतील. ग्रामीण समाजाचे बदलते लोकजीवन तसेच त्यातील वास्तव्यतेचा आशय असणाऱ्या कथा साहित्याची अंगभूत वैशिष्टे नोंदवता येतील. कथाकार आसाराम लोमटे यांच्या कथानिर्मिती मागील प्रेरणा देणाऱ्या गोष्टीचे स्वरूप पहायला मिळते.

त्याचप्रमाणे त्यांच्या कथेतील सामाजिक जीवनाचे बदलते स्वरूप, राजकीय वास्तव, शिक्षणाचे वास्तव, मराठवाड्यातील ग्रामीण लोकजीवनाविषयीची वैचारिक भुमिका अभ्यासता येईल.

प्रकरण रचना :

प्रकरण १ ले : उपोद्‌घात

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास विषयाची प्रस्तावना, संशोधनाची गरज, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची साधने, संशोधन पद्धती त्यामागील उद्देश तसेच संशोधनाची अभ्यास विषयाची उद्दिष्टे, त्यातील संभाव्य निष्कर्ष या सर्व बाबींचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे : इ.स. २००० नंतरची मराठी कथा

या प्रकरणात सन २००० नंतरच्या काळातील कथा कश्या बदलत गेल्या यांचा ऐतिहासिक आढावा घेतला जाईल.

प्रकरण तिसरे : आसाराम लोमटे यांचे जीवन आणि साहित्य

प्रस्तुत प्रकरणात आसाराम लोमटे यांचा व्यक्तीपरिचय, वाङ्‌मयपरिचय, मिळालेले पुरस्कार, भूषविलेली पदे त्यांचा जीवन विषयक दृष्टीकोन आणि त्यांच्या साहित्यिक लेखनाच्या प्रवासाचा अभ्यास करण्यात येईल. त्यांचे कथालेखन, त्यातील व्यक्तीरेखा, भुमिका, निसर्गवर्णन, निवेदन, घटना-प्रसंग, इत्यादी घटकांचा शोध या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण चौथे : लोमटे यांच्या कथांचे स्वरूप

आसाराम लोमटे यांच्या ('इडा पीडा टळो', 'आलोक' आणि 'वाळसरा') या कथासंग्रहांचा अभ्यास करण्यात येईल. त्यांच्या कथेतील ग्रामीण भाषा, संवादात्मकता, नाट्यात्मकता, ग्रामीण लोकजीवन त्यांच्या अडचणी व्यक्त करणारी वाक्यरचना इत्यादी द्वारे त्यांच्या कथांचे स्वरूप स्पष्ट करता येईल.

प्रकरण पाचवे : स्त्री आणि पुरुष व्यक्तीरेखा

आसाराम लोमटे यांच्या ग्रामीण भागातील स्त्री आणि पुरुषातील असमानता, त्यांचे वैचारिक आधार, शिवाय स्त्री-पुरुषांची भाषाशैली, कथेतील जातीवाचक शब्द, निवेदन शैली स्पष्ट करता येईल.

प्रकरण सहावे : लोमटे यांच्या कथेतील वाङ्‌मयीन भाषा आणि शैली

लोमटे यांच्या कथासंग्रहातील ग्रामीण भाषेचा तसेच त्यांच्या जीवनशैलीचा अभ्यास केला जाईल. आसाराम लोमटे यांनी आपल्या कथेत गावाकडची भाषा, इंग्रजी शब्द, वाक्यरचना, कथेत येणारी संवादात्मकता, नाट्यात्मकता व भाषेची रचना त्यातील वाक्यरचना, म्हणी, विशिष्ट अर्थाचे शब्द शिवाय ग्रामीण लोकांचे साधे-सरळ राहणीमान ह्या त्यांच्या जीवनशैलीचा, ग्रामीण वातावरणाचा उत्कट अनुभव आपल्या कथासंग्रहातून उमटवला आहे, त्याचा संशोधक या नात्याने शोध घेतला जाईल.

प्रकरण सातवा : उपसंहार

या प्रकरणात संशोधनाचा सार काढून हाती आलेले निष्कर्ष नोंदवले जातील.

ह्या प्रबंधाचा अभ्यास संशोधक वरिलप्रमाणे ७ प्रकरणातून करणार आहे. (पहिल्या ते सातव्या प्रकरणाचा अभ्यास करून निष्कर्ष आणि समारोप करण्याचे योजिले आहे.)

परिशिष्टे :

अ) संदर्भ ग्रंथ

ब) नियतकालिके

मार्गदर्शक

डॉ. विलास शेषराव पाटील

प्रोफेसर, संशोधन मार्गदर्शक

आणि मराठी विभाग प्रमुख,

ज्ञानोपासक महाविद्यालय,

ता. जिंतूर - ४३१५०९,

जि. परभणी.

संशोधक

पूजा अशोकराव शहाणे

(कैलास नगर, नांदेड - ४३१६०५.)

संदर्भ ग्रंथसूची :

१) लोमटे आसाराम	:-	‘इडा पीडा टळो’ (कथासंग्रह) शब्द पब्लिककेशन मुंबई, चौथी आवृत्ती, २०१६.
२) लोमटे आसाराम	:-	‘आलोक’ (कथासंग्रह) शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २०१०.
३) लोमटे आसाराम	:-	‘वाळसरा’ (कथासंग्रह) शब्द पब्लिकेशन, मुंबई प्रथम आवृत्ती, २०२३.
४) मुलाटे वासुदेव	:-	‘ग्रामीण साहित्य:स्वरूप व दिशा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. तृतीयावृत्ती, २०११.
५) जाधव रमेश	:-	ग्रामीण कथा वास्तवता आणि रंजकता, गोरवाणी प्रकाशन औरंगाबाद. तृतीयावृत्ती, २०१०.
६) देशमुख गणेश	:-	ग्रामीण समाजजीवन व साहित्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. तृतीयावृत्ती, २००८.
७) कोत्तापल्ले नागनाथ	:-	‘साहित्याचा अन्वयार्थ’, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती, २००८.

हा संशोधन आराखडा तात्पुरता आहे. संशोधन प्रक्रिये दरम्यान काही बदल संभवल्यास त्यामध्ये किरकोळ बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

❑❑❑